# दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड., मुंबई ४०० ०२८.

वसुली व विधी विभाग

## सन २०२१-२२ साठी एकरकमी कर्ज परतफेड योजना.

**१) प्रस्तावना :-**

महाराष्ट्र शासन सहकार, पणन, व वस्त्रोद्योग विभाग यांनी शासन निर्णय क्रमांक : युआरबी-१८०७/प्र.क्र. ४५९ ब/७-स. द्वारे नागरी सहकारी बँकाकरिता एक रकमी कर्ज परतफेड योजना सादर केली होती. सदर योजना सोबत जोडलेल्या परिशिष्ट अनुसार आहे. सदर योजना व शुध्दीपत्रक मा. संचालक मंडळाच्या सभेत अनुक्रमे दि.२४.११.२०१७ व दि.१९.०३.२०१८ रोजी यापूर्वी मंजुरी घेण्यात आली आहे. आता सन २०२१-२२ मधील योजनेस मान्यता घेणेस्तव कार्यालयीन टाचण सादर करणेत येत आहे.

**२) नवीन तरतूदी :-**

नागरी सहकारी बँकांच्या अनुत्पादक कर्जामधील प्रभावी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम - १५७ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांच्या अधिन राहून ही योजना अंमलात आणण्यापुरती महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ च्या नियम ४९ मधील तरतुदीमधून सूट देऊन नागरी सहकारी बँकांना शासन निर्णय समक्रमांक दिनांक १५.११.२०१७ व शासन शुध्दीपत्रक निर्णय समक्रमांक दिनांक २६.०२.२०१८ नुसार मंजूर केलेल्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेस दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे.

यामधील महत्वाच्या बाबी :

१. सदर योजनेअंतर्गत एक रकमी कर्ज परतफेड योजनेचा लाभ घेण्यासाठी या योजनेची मुदत दिनांक ३१-०३-२०२२ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत दिनांक २८-०२-२०२२ पर्यंत अर्ज प्राप्त करुन दि. ३१-०३-२०२२ पर्यंत बँकेने निर्णय घ्यावयाचा आहे म्हणजेच अर्ज प्राप्त करण्याची अंतिम तारीख २८-०२-२०२२ असून निर्णयाची अंतिम तारीख ३१-०३-२०२२ पर्यंत आहे.

२. सदर योजनेनुसार दिनांक ३१-०३-२०१९ अखेर जी कर्जखाती अनुत्पादक कर्जाच्या संशयीत किंवा बुडीत वर्गवारीत समाविष्ट केलेली असतील अशा सर्व कर्ज खात्यांनाही योजना लागू होईल.

३. तसेच दिनांक ३१-०३-२०१९ अखेर अनुत्पादक कर्जाच्या सबस्टॅन्डर्ड वर्गवारीत समाविष्ट झालेल्या व नंतर संशयीत व बुडीत वर्गवारीत गेलेल्या कर्जखात्यांना देखील ही योजना लागू होईल.

४. सदर योजना अंमलात आणताना वरील १ ते ३ तरतूदीं व्यतिरिक्त संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक १५.११.२०१७ व शुध्दीपत्रक दिनांक २६.०२.२०१८ मधील इतर तरतूदी कायम राहतील.

**३) सदर सन २०२१- २२ सालाची एकरकमी कर्ज परतफेड ही खालीलप्रमाणे :-**

**अ.** कर्जदाराने नागरी सहकारी बँकांसाठी या एक रकमी कर्ज परतफेड योजनेनुसार करावयाच्या अर्जासोबत, सदर कर्ज प्रकरण ज्या दिवशी अनुत्पादक कर्जाच्या संशयीत-१ (Doubtful-I) या वर्गवारीत वर्गीकृत केले असेल, त्या दिवशीच्या लेजर बॅलन्सच्या (मुद्दल + व्याज) किमान ५% रक्कम भरणे आवश्यक आहे.

**ब.** (I). नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत अर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यापासून कर्जदाराने एक महिन्यात तडजोडीची सर्व रक्कम भरणे आवश्यक आहे. अथवा

(II). नागरी सहकारी बँकांसाठी एक रकमी कर्ज परतफेड योजनेंतर्गत अर्ज मंजूरीचे पत्र प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत कर्जदाराने तडजोड रकमेच्या किमान २५% रक्कम भरल्यास उर्वरित रक्कम भरण्यास पुढील जास्तीत जास्त ११ मासिक हप्त्यांचा कालावधी देण्याची मुभा देता येईल. कर्जदाराने १ महिन्यांत २५% रक्कम न भरल्यास सदर योजनेचा लाभ घेणेस कर्जदाराने नकार दिला आहे असे समजून कर्जदाराने अर्जासोबत भरणा केलेली ५% रक्कम बँकांनी मुद्दलात जमा करुन घ्यावी.

(III). उर्वरित ७५% रकमेचा भरणा पुढील ११ मासिक हप्त्यामध्ये करावयाचा असून, त्यास द.सा.द.शे. ८% दराने सरळव्याज पध्दतीने व्याजाची आकारणी केली जाईल. या कालावधीत कोणताही हप्ता भरण्यास उशीर झाल्यास त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी व उशीर झालेल्या रकमेवर द.सा.द.शे. २% दंड व्याज आकारण्यात येईल.

**क.** प्रथम १२ महिन्यांच्या कालावधीत तडजोड रकमेचा संपूर्ण भरणा अर्जदाराने न केल्यास, उर्वरीत रकमेसाठी त्यास जास्तीत जास्त १२ महिन्यांचा जादा कालावधी देण्याची मुभा बँकेस राहील. अशा कालावधीसाठी उर्वरीत रकमेवर द.सा.द.शे. ११% व्याजदर आकारला जाईल. या वाढीव कालावधीत कोणताही हप्ता भरण्यास उशीर झाल्यास त्यावर उशीर झालेल्या मुदतीसाठी व उशीर झालेल्या रकमेवर द.सा.द.शे. २% दंड व्याज आकारण्यात येईल. (यापैकी सदर वाढीव कालावधीतही कर्जदाराने ३ हप्ते अथवा ३ हप्त्याऐवढी रक्कम थकीत ठेवल्यासही कर्जदार या योजने अंतर्गत अपात्र होईल.)

**ड.** वरीलप्रमाणे जास्तीत जास्त २४ महिन्यात तडजोड रकमेचा भरणा अर्जदाराने न केल्यास, अर्जदारास दिलेली सवलत रद्द करुन त्यांनी यापूर्वी भरणा केलेली सर्व रक्कम प्रथम थकित व्याजापोटी व नंतर मुद्दलापोटी वसूल करुन नियमित व्याजासह व इतर सर्व खर्चासह सर्व येणे रक्कम वसूल करण्याचा अधिकार बँकेस राहील.

**ई.** दि.३१-०३-२०१९ रोजीच्या कट ऑफ डेटला पात्र असलेल्या सर्व थकबाकीदार कर्जदारांना या योजनेत सहभागी होता येईल. तथापी, बँकेचे ग्रॉस NPA चे प्रमाण खूपच वाढल्याने बँकेने बहुतांश थकीत कर्जदारांवर सहकार कायदा कलम १०१ अथवा सरफेसी कायद्याखाली कारवाई सुरु केली आहे, अशा ज्या थकीत कर्जदारांवर बँकेने कलम १०१ वा

सरफेसीची कारवाई ही योजना येणेपूर्वीच सुरु केलेली आहे, ते जर दि.३१-०३-२०१९ च्या कट ऑफ डेटला पात्र असतील तर त्यांनाही सदरील योजनेत सहभागी होता येईल. मात्र अशा कर्जदारांनी बँकेच्या विरोधात कोणत्याही कोर्टात दावा गुदरलेला असेल तर तो त्यांना मागे घ्यावा लागेल. तसेच बँकेची वसुली येत्या आर्थिक वर्षात त्वरेने होणेचे गरजेचे असल्याने अशी कारवाई सुरु असलेल्या थकीत कर्जदारांनी दि.३० सप्टेंबर २०२१ पूर्वी ५% भरुन या योजनेत अर्ज दाखल करणेचे आहेत.

सोबत कर्जदारांने या योजनेसाठी भरावयाचा अर्ज जोडला असून तो संबंधितास डाऊनलोड करता येईल.

**व्यवस्थापक**
**(वसुली व विधी विभाग)**

**विशेष कार्यपालन अधिकारी**
**(वसुली विभाग)**

**सरव्यवस्थापक**

नाव :- ____________________

पत्ता :- ____________________,

____________________.

दूरध्वनी क्र .:- ____________________

दिनांक :- ____________________

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
**दि डेक्कन मर्चंटस् को-ऑप.बँक लि.**
**१/१३-१४, गणानाथ को.ऑप.हौसिंग सोसायटी,**
**सेनापती बापट मार्ग,**
**दादर (प.) मुंबई -२८.**

**विषयः- शासन निर्णय दिनांक १३.०८.२०२१ च्या नुसार नागरी सहकारी बँकासाठी "एक रकमी परतफेड योजना २०२१-२२ " अंतर्गत सवलत मिळणेबाबत विनंती अर्ज.**

**संदर्भ :- माझे थकीत कर्जखाते क्र. ____________ शाखा ____________.**

महोदय,

माझे उपरोक्त संदर्भिय कर्जखाते क्रं ____________ थकीत असून, बँकेच्या पुस्तकात अनुत्पादक कर्जाच्या सब स्टँडर्ड (Sub-Standard)/संशयित -१(D-1) या वर्गवारीत वर्गीकृत केली आहेत. माझ्या कर्जखात्यांचा तपशील पुढीलप्रमाणेः-

| अ. क्रं. | कर्जखात्याचा प्रकार | अनुत्पादक कर्जाचे वर्गीकरण | डी-१ ची थकीत रक्कम (मुददल+व्याज) |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |

सदर कर्ज खात्यावरील येणे रक्कम मला शासन निर्णय दिनांक १३-०८-२०२१ च्या नुसार नागरी सहकारी बँकासाठी एकरकमी परतफेड योजने अंतर्गत भरावयाची असून, या योजने अंतर्गत मी देय असणारी रक्कम तडजोडीची रक्कम मला त्वरित कळवावी.

मी, ____________________ शपथपूर्वक सांगतो की, नागरी सहकारी बँकासाठी "एकरकमी कर्ज परतफेड योजना २०२१-२०२२" च्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या मला मान्य आहेत व मी त्यांचे पालन करण्याची हमी देतो तसेच मी केलेल्या या अर्जास, माझ्या कर्जास जामिनदार असलेल्या सर्वांची मान्यता आहे.

सदर योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुढील ५ वर्षांपर्यंत बँकेकडून कोणत्याही प्रकारचे कर्ज/ सवलत मला घेता येणार नाही तसेच इतर कोणत्याही कर्जास / सवलतीस पुढील ५ वर्ष मी जामीन राहू शकणार नाही याची मला कल्पना असून त्यास माझी मान्यता आहे.

सदर योजनेतील अटींनूसार, अर्जासोबत मी माझ्या संबंधित कर्जखात्यांवर सब स्टँडर्ड (Sub-Standard)/संशयित-१ (D-1) रोजी येणे असलेल्या लेजर बॅलन्स + त्यादिवसापर्यंतचे येणे व्याज अशा रु. __________ इतक्या येणे रक्कमेच्या ५ % म्हणजेच रु. ____________ चा डिमांड ड्राप-ट/पे-ऑर्डर सोबत जोडत आहे अथवा रक्कम रोख भरणा केलेला आहे.

तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करावा शासन निर्णय क्रमांक युआरबी १८०७ /प्र.क्र.४५९ ब/७-स दिनांक १३-०८-२०२१ मधील एकरकमी परतफेड योजनेची सवलत मला दयावी अशी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

सही

(नाव :- ____________________ )

कर्ज खाते क्र. :-
शाखेचे नाव :-